# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०१८/663

दिनांक :- 11 MAR 2019

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी व अर्जाची तपासणी करण्याकरीता देण्यात आलेल्या अंतिम मुदतीबाबत.**

**संदर्भ** :- १.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १८/तंशिस/ईबीसी/डीबीटी/२०१९/१०४ दि. २/३/२०१९.

२. या कार्यालयाचे पृष्ठांकन क्रमांक :-विकाअ/शिक्षण/२०१९/६०९ दि. ५ मार्च २०१९.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, माहीती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी आयोजित केलेल्या बैठकीतील निर्णयानुसार राज्यातील विविध विभागांना शिष्यवृत्ती योजनासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याची व विभागाना सदर अर्जाची तपासणी (मंजुर/नामंजुर) करण्याची अंतिम मुदत निश्चीत करण्यात आलेली असून तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांकरीता विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अंतिम **दिनांक १/३/२०१९** व अर्जाची तपासणी (मंजुर/नामंजुर) करण्यासाठी **अंतिम दिनांक १५/३/२०१९** असा निश्चीत करण्यात आलेला आहे.

तेव्हा याबाबत आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी **अंतिम दिनांक १/३/२०१९** हा असुन प्राप्त अर्जाची तपासणी करण्याची अंतिम **दिनांक १५/३/२०१९** अशी असल्याने आपल्या संस्थेतील अर्जाची तपासणी **दिनांक ११/३/२०१९** पर्यंत करुन त्याच दिनांकापर्यंत या कार्यालयाकडे पाठवावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणत्याही स्तरावर आपल्या स्तरावर पेडीग राहीलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत व असे अर्ज अंतिम दिनांकानंतर आपोआपच सिस्टीममधून रद्द होईल, याची कटाक्षाने आपल्या स्तरावर नोंद घ्यावी.

तसेच पात्र विद्यार्थ्याचे नुकसान होऊ नये या कारणास्तव आपल्या स्तरावरुन अर्ज अंतिम दिनांकापुर्वी निकाली काढावे. तसेच विद्यार्थ्यांचे Sent Back करण्यात आलेले अर्ज जर विद्यार्थी/क्लार्क/प्राचार्य यांच्या लॉगिनमध्ये त्यावरील पुढील कार्यवाहीसाठी प्रलंबित असतील तर अश्या अर्जाबाबतची प्रलंबित कार्यवाहीसुध्दा अंतिम दिनांकापुर्वी पुर्ण करुन निकाली काढावेत. प्रलंबित अर्जाबाबतची कार्यवाही विहीत मुदतीत पुर्ण न केल्यास रद्द झालेल्या अर्जाची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील, याची नोंद घ्यावी तसेच याबाबत आपल्या संस्थेमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना आपल्या स्तरावरुन सुचित करुन निदर्शनास आणावे.तसेच याबाबत या कार्यालयाचे संदर्भ २ अन्वये आपणास कळविण्यात आलेले आहेतच.

(डॉ. डी.व्ही. जाधव)
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

E:\backup old\backup kadam\all manish letter ghts50.docx